नि. फौ. खटला क्र. <u>३५८/२०२२</u>
सरकार विरूद्ध प्रकाश
**निशाणी २३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी</u>**
सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,
माझे नाव : अशिष सुभाष बेलोकार,
वय : ३३ वर्षे,
धंदा : मजुरी,
राहणार : सोमवार वेस, नंदीपेठ, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

मी फिर्यादी व आरोपी दोघांना ओळखत नाही. मला आकोट शहर पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलवले नव्हते. माझेसमक्ष पंचनाम्याची कारवाई झाली नाही. आता मला घ टनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर अनु क्र. १ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९/०६/२०२३ रोजी नंदीपेठ ते सोमवार वेस रोडवर फिर्यादीच्या गोडाउन मध्ये पोलीसांनी मला बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी माझे समक्ष पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार

केला व मला वाचुन दाखवला व त्यावर मी त्याठिकाणी सही केली होती.

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपींतर्फे ॲडव्होकेट श्री. एस. जी. कुळकणी यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०६.०३.२०२६ (ए.ए. माळी)

अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.